मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com

follow us : /rajdandlive

सातारा दि. २५ मे २०२४

RNI Regd No.72105/99 * वर्ष २५ * अंक २६० * सातारा * सातारा रविवार दि. २ जून २०२४ * पाने ८ * किंमत ५ रू/

# नव्या संसदेत कुणाची सत्ता ? महाराष्ट्रात काय घडणार !

## एक्झिट पोलचा अंदाज काय ४ जूनच्या निकालाकडे लक्ष !

**मुंबई** : लोकसभेच्या निवडणुकीच्या मतदानाचा शेवटचा टप्पा आज संपला. ४ जूनला मतमोजणी होणार आहे, त्यामुळं सगळ्या देशाचं लक्ष आता ४ जूनकडे लागले आहे. नवीन संसदेत कुणाची सत्ता येंणार आहे. मोदी पंतप्रधान होणार का ? इंडिया आघाडीला किती जागा मिळतील, कोणाला पराभवाची धूळ चाखावी लागणार याची उत्सुकता आता शिगेला पोहोचली आहे. तसेच शिवसेना आणि राष्ट्रवादी या दोन मोठ्या प्रादेशिक पक्षांमध्ये फूट पडल्यानंतर ही सगळ्यात मोठी सार्वत्रिक निवडणूक ठरल्याने महाराष्ट्रात नेमकं काय घडणार, याकडेही देशाचे लक्ष वेधले आहे.

लोकसभा निवडणुकीत भाजप, शिंदेंची शिवसेना, अजित पवारांची राष्ट्रवादी, रिपाइं आणि मनसे अशी महायुती तर दुसरीकडे काँग्रेस, उध्दव ठाकरेंची शिवसेना, शरद पवारांची राष्ट्रवादी अशी महाविकास आघाडी असा सामना रंगला होता. वंचित बहुजन आघाडीने स्वतंत्रपणे उमेदवार उभे केले होते. मात्र त्याचा फारसा परिणाम दिसून आला नाही. खरी लढत महायुती विरूध्द महाविकास आघाडी अशीच झाली. मुंबई ठाण्यात शिवसेना विरूध्द शिवसेना असा सामना पाहायला मिळाला. सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांनी जाहीर सभा, रॅली, प्रचारसभा घेऊन परिसर पिंजून काढला. मात्र मतदारांमध्ये फारसा उत्साह दिसून आला नाही. महाराष्ट्रातल्या या राजकीय बदलांचा नेमका काय परिणाम झाला हे ४ जूनला स्पष्ट होणार आहे. पण त्याआधीच देशभरातील सर्व एक्झिट पोलमध्ये महाराष्ट्रात कोण किती जागा जिंकणार, याचा अंदाज वर्तवलाय. महाराष्ट्रात लोकसभेच्या महाराष्ट्रात एकूण ४८ जागा आहेत, त्यापैकी भाजप - २८, शिवसेना (एकनाथ शिंदे) - १५, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) -४, रासप (महादेव जानकर )- १ अशा महायुतीकडून जागा लढवल्या. तर शिवसेना (उद्धव ठाकरे) - २१ काँग्रेस - १७ राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) - १० जागा लढवल्या. एक्झिट पोलच्या अंदाजानुसार देशात एनडीएला अधिक जागा मिळण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. तर महाराष्ट्रात महाविकास आघाडीला अधिक जागा मिळण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

काय आहे महाराष्ट्रात एक्झिट पोलचा अंदाज

एबीपी-सी व्होटर मविआ २३ तर महायुतीला २४ जागा

ढत९ पोलस्ट्राटच्या महायुती २२ आणि महाविकास आघाडी २५

इंडिया न्यूज डी डायनॅमिक्स महायुती - ३४ मविआ - १३,

न्यूज २४ चाणक्य महायुती - ३३ तर मविआ - १५

रिपब्लिक भारत-मॅट्रीझ महायुती - ३० ते ३५ मविआ - १३ ते १९

**देशातील एक्झिट पोलचा अंदाज**

टिव्ही ९ : एनडीए २१६ तर इंडिया १३४

आज तक : एनडीए १६१ ते १८० तर इंडिया ७९ ते १००

एबीपी : एनडीए २२७ ते २६९, इंडिया



११८ ते १५५

इंडिया टिव्ही सीएनएक्स : एनडीए ३७१ ते ४०१ तर इंडिया १०९ ते १३९

न्यूज १८ : एनडीए २५५ ते २७० आणि इंडिया १११ ते १२६

रिपब्लिक टिव्ही : एनडीए ३५९ तर इंडिया १५४

न्यूज नेशन : एनडीए ३४२ ते ३४८ तर इंडिया १५३ ते १६९

**२०१९ चा एक्झिट पोलचा अंदाज चुकला होता.**

२०१९ लोकसभा निवडणूक निकालाआधी आलेला एक्झिट पोलचा अंदाज पूर्णपणे चुकला होता. एक्झिटपोलच्या अंदाजानुसार, महाराष्ट्रात भाजप-शिवसेना आघाडीला ३६ ते ३८ जाग मिळतील असा अंदाज वर्तवण्यात आला होता. पण निकालानंतर महाराष्ट्रात भाजप-शिवसेना युतीला ४१ जागांवर यश मिळाले. काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसला एक्झिट पोलमध्ये १० ते ११ जागा मिळतील असा अंदाज वर्तवण्यात आला होता. पण काँग्रेस-राष्ट्रवादीला चार जागा मिळाल्या.

## लोकसभा निकाल लागल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला पुन्हा एकदा मोठे खिंडार पडणार : सुनील तटकरे

**मुंबई** : लोकसभा निवडणुकीचे निकाल लागल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला पुन्हा एकदा मोठे खिंडार पडणार असून त्या ऋषीने पक्षाचे काही आमदार काँग्रेस नेत्यांच्या संपर्कात असल्याचा दावा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी केला आहे.



निवडणुकांचे निकाल लागल्यानंतर आमच्याकडे परत घेण्यासाठी आमच्यापासून दूर गेलेल्यांच्या रांगा लागतील. मात्र, अडचणीच्या काळात पक्ष सोडून गेलेल्यांना पुन्हा प्रवेश दिला जाणार नाही, असे विधान राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते अनिल देशमुख यांनी नुकतेच केले होते. त्यांच्या या विधानाला छेद देत तटकरे यांनी शरद पवार गटातच मोठी फूट पडण्याची शक्यता पत्रकारांची अनौपचारिक संवादात व्यक्त केली आहे

राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष आणि लेडी जेम्स बॉण्ड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सोनिया दुहान यांनी नुकतीच काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांची भेट घेतली आहे. शरद पवार आमचे नेते आहेत आणि राहतील, अशी ग्वाही देतानाच दुहान यांनी पक्षाच्या कार्याध्यक्ष सुप्रिया सुळे यांचे नेतृत्व मानण्यास मात्र साफ नकार दिला आहे.

सुप्रिया सुळे यांच्यावर नाराज असलेल्या दुहान पक्ष सोडणार असल्याची चर्चा असून त्यांनी पटोले यांची भेट घेतल्याने त्यांच्या काँग्रेस प्रवेशाची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यांच्याबरोबरच सुप्रिया सुळे यांच्यावर नाराज असलेले आणखी काही आमदार आणि नेते आपल्या कार्यकर्त्यांसह काँग्रेसमध्ये प्रवेश करतील, असा दावा तटकरे यांनी केला आहे.

## केजरीवालांना सरेंडर व्हावे लागणार

### कोर्ट अंतरिम जामिनावर ५ जूनला निकाल देणार

**मुंबई** : आपचे राष्ट्रीय संयोजक, दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवालयांना राऊज अव्हेन्यू कोर्टाने दिलासा दिलेला नाही. यामुळे केजरीवाल यांना उद्या ठरल्याप्रमाणे तुरुंगात सरेंडर करावे लागणार आहे. यामुळे केजरीवाल यांचे निकालापूर्वीच तुरुंगात जाणे नक्की झाले आहे. कोर्टाने केजरीवालांच्या अंतरिम जामिनाचा निकाल राखून ठेवला असून तो ५ जून रोजी दिला जाणार आहे.

केजरीवाल याना निवडणुकीच्या प्रचारासाठी जामिन देण्यात आला होता. निवडणूक संपल्यानंतर त्यांना तुरुंगात पुन्हा जावे लागणार होते.

हा जामिन आणखी आठवड्याभराने वाढविण्याची मागणी केजरीवाल यांनी केली होती.यासाठी केजरीवाल यांनी त्यांच्या आरोग्याचे कारण दिले होते. त्यांना पीईटी, सीटी स्कॅन आणि अन्य काही टेस्ट करायच्या असल्याचे त्यांचे म्हणणे होते. यासाठी त्यांना सात दिवसांचा वेळ मिळावा अशी मागणी करण्यात आली होती. अटकेनंतर केजरीवालांचे वजन सात किलोंनी कमी झाल्याचा दावाआपनेकेला होता. तसेच त्यांची कीटोन लेव्हल खूप जास्त असल्याचेही म्हटले होते. यावर ईडीने केजरीवाल यांचे वजन कमी नाही तर उलट एक किलोने वाढल्याचा दावा केला होता. दिल्ली अबकारी धोरण प्रकरणात घेरलेल्या केजरीवाल यांना गेल्या महिन्याच्या सुरुवातीला सर्वोच्च न्यायालयाकडून दिलासा मिळाला होता.

## विरोधकांची इंडिया आघाडी ४०० हून अधिक जागा जिंकेल : अखिलेश यादव



**नवी दिल्ली** : निकालापूर्वीचे अंदाज जाहीर होण्यास काही तासांचा कालावधी शिल्लक असतानाच या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय लोकशाही आघाडी नव्हे तर विरोधकांची इंडिया आघाडी ४०० हून अधिक जागा जिंकेल, असा अजब दावा समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी केला आहे.

लोकसभा निवडणुकीसाठी होणाऱ्या मतदानाचा अखेरचा टप्पा आज संपुष्टात येत आहे. त्यानंतर मतदानोत्तर अंदाज जाहीर होण्यास सुरुवात होईल. त्यापूर्वी अखिलेश यांनी ट्विट करून इंडिया आघाडीच्या जागा दुप्पट होणार आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा पराभव होणार, असा दावा केला आहे.

दोन फांद्यांवरील चिमण्यांपैकी एका फांदीवरील एक चिमणी दुसरीकडे गेली तर त्यांची संख्या दुप्पट होते आणि दुसऱ्या फांदीवरील चिमणी पहिल्या फांदीवर गेली तर दोन्ही फांद्यांवरील चिमण्यांची संख्या सारखी होते, या कोड्याची आठवण करून देत अखिलेश आपल्या ट्विटमध्ये म्हणतात की,, कालपर्यंत त्यांच्याबरोबर असणारे मतदार आज आमच्या बाजूने आले आहेत. त्यामुळे लोकसभेतील आमच्या जागांची संख्या दुप्पट आणि भाजपची निम्मी होणार हे निश्चित आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडी १४० पेक्षा अधिक जागा घेऊ शकणार नाही आणि इंडिया आघाडी ४०० पेक्षा अधिक जागा जिंकेल.

## मराठवाड्यात कोण बाजी मारणार ?

**मुंबई** : देशात सध्या लोकसभा निवडणुकीच्या सातव्या टप्प्यातील मतदान चालू आहे. लवकरच मतदानाची ठराविक वेळ संपणार असून त्यानंतर वेगवेगळ्या माध्यम संस्थांचे एक्झिट पोल समोर येतील. या एक्झिट पोलच्या माध्यमातून देशात कोणाची सत्ता येणार? कोणाला किती जागा मिळणार? याचे अंदाज बांधले जातील. दरम्यान, या निवडणुकीत मराठवाड्यातील काही जागा चांगल्या चर्चेत राहिल्या. यात जालना, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, धारावीश अशा जागांचा समावेश आहे. याच पार्श्वभूमीवर गेल्या कित्येक वर्षांपासून मराठवाड्यात पत्रकारिता करणाऱ्या स्थानिक पत्रकारांनी या निवडणुकीत कोण बाजी मारणार याचा अंदाज सांगितला आहे.

बीडची निवडणूक सुरुवातीला एकतर्फी वाटत होती. पण नंतर ती अटीतटीची झाली. बीडचा निकाल पूर्वीप्रमाणेच लागणार. म्हणजेच ही जागा भाजपच्याच खिशात जाणार असं वाटतंय. या जागेवरून पंकजा मुंडे विजयी होण्याची शक्यता आहे, असे मत मराठवाड्यातील पत्रकार वसंत मुंडे यांनी व्यक्त केले आहे.

**महायुतीला तीन आणि महाविकास आघाडीला चार जागा?** एकूण आठ जागांपैकी छत्रपती संभाजीनगरमधील निकालाबाबत अद्याप काही सांगता येणार नाही. पण अन्य सात जागांपैकी ३ जागा या महायुतीला तर ४ जागा या महाविकास आगाडीला मिळण्याची शक्यता आहे. जालना, बीड, लातूर या जागा महायुतीला मिळण्याची शक्यता आहे. तर धाराशीव, नांदेड,परभणी, हिंगोली या जागांवर महाविकास आघाडीच्या उमेदवाराचा विजय होण्याची शक्यता आहे, असे एका पत्रकाराचे मत आहे, असा थेट अंदाज दैनिक लोकसत्ताचे वरिष्ठ पत्रकार सुहास सरदेशमुख यांनी व्यक्त केला.नांदेड, धाराशीवमध्ये महाविकास आघाडी ?यावेळी मराठवाड्यातील चित्र फार भिन्न पाहायला मिळत आहे. या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीची ताकद ही फक्त बीडपर्यंत दिसत आहे.बीडमध्येही चुरशीची लढत होईल आणि तिथे पंकजा मुंडे निवडून येतील असं वाटतंय. बाकीच्या सात जागांवर महाविकास आघाडीचा विजय होण्याची शक्यता आहे. जालन्यात सत्ताविरोधी जनमत तयार झाल्यामुळे भाजपचे अंबादास दानवे यांचा पराभव होण्याची शक्यता आहे. अशोक चव्हाण यांच्यासाठी नांदेडची जागा प्रतिष्ठेची होती. मात्र येथे काँग्रेसच निवडून येण्याची शक्यता आहे.अशोक चव्हाण भाजपत गेले नसते तर कदाचित चिखलीकर निवडून आले असते. धाराशीवमध्ये ओमराजे निंबाळकर प्रसिद्ध आहेत. त्या मतदारसंघात ऐनवेळी अर्चना पाटील यांना तिकीट देण्यात आलं.लातूरमध्ये यावेळी शिवाजी काळगे यांचा विजय होण्याची शक्यता आहे. यावेळी शेतकऱ्यांवर झालेला अन्याय, पंतप्रधानांची विधानं यामुळे लोकांमध्ये नाराजी आहे, असे मत ज्येष्ठ पत्रकार डॉ. संजीव उन्हाळे यांनी व्यक्त केले.

**जालन्यात चुरशीची लढत?** रावसाहेब दानवे सुरुवातीला प्रचारात आघाडीवर होते. ते पाच वेळा खासदार राहिलेले आहेत. पण शेवटच्या टप्प्यात दलित, मुस्लीम, मराठा मतं कल्याण काळे यांच्याकडे वळताना दिसले. त्यामुळे रावसाहेब दानवे यांच्यापुढे कल्याण काळे यांच्या रुपात फार मोठे आव्हान आहे, असे जालन्यात गेल्या अनेक वर्षांपासून पत्रकारिता करणारे ज्येष्ठ पत्रकार लक्ष्मण राऊत यांचे मत आहे.

## केरळनंतर तामिळनाडूत मान्सून धडकला



**मुंबई** : उन्हाच्या झळांनी त्रस्त नागरिकांना लवकरच दिलासा मिळणार आहे. उत्तर भारतात सध्या तीव्र उष्णतेची लाट पाहायला मिळत आहे, असं असताना दक्षिण भारतात मात्र मान्सूनची चाहूल लागली आहे. केरळमध्ये दोन दिवस आधीच मान्सून दाखल झाल्याची सुखवार्ता याआधीच हवामान खात्याने दिली आहे. केरळनंतर आता मान्सून तामिळनाडूमध्ये दाखल झाल्याची माहिती आयएमडीने दिली आहे.

केरळनंतर तामिळनाडूत धडकला मान्सून

भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, केरळमध्ये ३० मे रोजीच मान्सून धडकला. साधारणपणे १ जूनला मान्सून केरळमध्ये दाखल होत असतो, पण यंदा मान्सून दोन दिवस आधीच केरळमध्ये दाखल झाला आहे. मान्सूनचे ढग १५ जूनला मध्य प्रदेशात दाखल होऊ शकतात. २० जूनपर्यंत मान्सून उत्तर प्रदेशात पोहोचेल. केरळनंतर मान्सून तामिळनाडूत दाखल झाला आहे. केरळमध्ये नैऋत्य मान्सूनचा जोर वाढला आहे. मान्सूनमुळे केरळमध्ये मुसळधार पाऊस पडत असून त्यामुळे भूस्खलनाच्या घटना घडल्या आहेत.

येत्या काही दिवसांत आणखी मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. पुढील २४ तासांत केरळमध्ये मुसळधार ते अति मुसळधार आणि अति मुसळधार पावसाची शक्यता आहे. कोझिकोडच्या उरुमीमध्ये सर्वाधिक पाऊस झाला आहे. तेथे १४ सेमी पावसाची नोंद झाली. मान्सून सध्या पूर्वोत्तर दिशेने पुढे सरकत असल्याची माहिती आहे. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी मान्सून पूर्व पावसाची हजेरी पाहायला मिळत आहे.

## गंगोत्री मार्गात दरड कोसळली, नाशिकमधील भाविक थोडक्यात बचावले!



**नाशिक-** गंगोत्रीला गेलेल्या नाशिक मधील भाविकांच्या मार्गातच एक दुर्घटना घडली. गंगोत्री मार्गावर दरड कोसळल्याने अनेक गाड्या त्या

खाली दबल्या गेल्या मात्र, नाशिकमधील याठिकाणी असलेले २६ भाविक सुरक्षीतरीत्या बाहेर पडले. आता हे सर्व जण उत्तर काशी येथे पोहोचले आहेत.

सध्या शाळा-महाविद्यालयांना सुटी असल्याने नागरीक मोठ्या प्रमाणात धार्मिक पर्यटनासाठी बाहेर पडले आहेत. नाशिक मधील २६ भाविकांचे एक पथक

गंगोत्री आणि काशी येथे दर्शनासाठी २६ मेस नाशिकमधून बाहेर पडले होते. शुक्रवारी (दि.३१) गंगोत्री मार्गावर हर्षल येथे दरड कोसळल्याने गोंधळ उडाला. अनेक मोटारींवर दरडीचे दगड कोसळल्याने त्यांचा चक्काचूर झाला. मात्र, दरड कोसळण्याच्या घटनास्थळापासुन १५ किमी अंतरावर नाशिकचे भाविक

होते. परंतु दुर्घटना घडल्यानंतर सुरक्षीत आहोत हे देखील त्यांना सांगता येते नव्हते कारण इंटरनेट सेवाच ठप्प झाली होती. त्यामुळे त्यांचे कुटूंबिय चिंतेत होते. मात्र लष्कराने दरड हटवल्यानंतर मार्ग मोकळा झाल्याची माहिती तान या पर्यटक संस्थेचे माजी अध्यक्ष दत्ता भालेराव यांनी सांगितले.

हे सर्व भाविक आता उत्तर काशी येथे असून सर्वांचा प्रवास सुरळीत सुरू असल्याचे भालेराव यांनी सांगितले.

## दुष्काळ पाहणी करून समिती मदतीसाठी सरकारकडे अहवाल सादर करणार

### राज्यातील शेतकरी संकटात आणि कृषी मंत्री परदेशात; वडेट्टीवार

**मुंबई** : राज्यातील शेतकरी दुष्काळात होरपळत असताना सरकार आणि प्रशासन मात्र स्वतःच्या वेगळ्या दुनियेत व्यस्त आहे. विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतकऱ्यांना कोणतीही मदत सरकारकडून अजून मिळालेली नाही. त्यामुळे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळवून देण्यासाठी काँग्रेसने दुष्काळ संदर्भात नेमलेल्या विदर्भाच्या समितीची आज बैठक पार पडली.

शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडून कृषी मंत्री बाहेर आहेत, ते बाहेर असताना आयुक्तांची बदली होते.पूर्णवेळ सचिव नाही. खरीप हंगाम तोंडावर असताना बैठक होत नाही. खतांचा तुडवडा आहे, बियाणाचे दर वाढले, बियाण्यांसाठी लोक रांगेत उभे आहेत. या सर्व परिस्थितीवर उपाययोजना करण्याऐवजी सत्ताधारी परदेशात मजा मारत आहेत, अशा शब्दात विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारचे वाभाडे काढले आहेत.



विदर्भात ५ जून पासून ही समिती पाहणी दौरा करणार आहे. त्यानंतर सविस्तर अहवाल राज्य सरकार पुढे मांडून शेतकऱ्यांसाठी भरीव, ठोस अशा मदतीची मागणी करण्यात येणार आहे. या बैठकीलाआमदार विकास ठाकरे,आमदार रणजित कांबळे,आमदार सहसराम कोरोटे, आमदार अभिजित वंजारी,आमदार सुधाकर आडबाले, समन्वयक अतुल कोटेचा उपस्थित होते.

शेतकरी जगला काय आणि मेला काय या सरकारला काय फरक पडतो ? राज्यातील शेतकऱ्यांप्रती महायुती सरकारची अनास्था यामधून दिसत आहे. दुष्काळी परिस्थितीवर उपाययोजना करण्याऐवजी सत्ताधारी गायब आहेत. विदर्भातील शेतकऱ्यांना कोणतीही मदत सरकारकडून मिळत नसून अनास्था असल्याचे वडेट्टीवार यांनी स्पष्ट केले.

## संपादकीय

### पुन्हा अडचणीत!



लाच दिल्याप्रकरणी पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानीवादाच्या भोवऱ्यात राहण्याची सवय जडलेले अमेरिकेचे माजीराष्ट्राध्यक्षडोनाल्ड ट्रम्प, गप्प राहण्यासाठी लाच दिल्याच्या प्रकरणात दोषी सिद्ध झाल्याने, पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहेत. ट्रम्प केवळ अमेरिकेचे माजीराष्ट्राध्यक्षअसते, तर कदाचित या विषयाची अमेरिकेबाहेर फार चर्चा झालीही नसती; पण ते पुन्हा एकदा राष्ट्राध्यक्षपदावर आरूढ होण्याची मनीषा बाळगत असल्याने, जगभरच त्या प्रकरणाचे पडसाद उमटणे स्वाभाविक आहे.

अर्थात ट्रम्प हे काही गपगुमान राहणारे व्यक्तिमत्त्व नाही. ज्यांच्या समक्ष खटला सुरू आहे, त्या न्यायाधीशांवरच भ्रष्ट असल्याचा ठपका ठेवत, वरिष्ठ न्यायालयात दाद मागण्याची घोषणाही त्यांनी केली आहे. कायद्याचे राज्य असलेल्या लोकशाहीप्रधान देशात वरिष्ठ न्यायालयात आव्हान देण्याचा अधिकार प्रत्येकाला असतो आणि ट्रम्प तो वापरत असतील, तर त्यामध्ये काहीही वावगे नाही; पण त्यांनी स्वत:ला बळीचा बकरा म्हणून सादर करून सहानुभूती मिळविण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा, ते सदैव वादाच्या भोवऱ्यात का सापडतात, याचे कधी तरी आत्मपरीक्षण करायला हवे. ट्रम्प नोव्हेंबरमध्ये होऊ घातलेल्या अध्यक्षीय निवडणुकीत विद्यमान राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांना आव्हान देण्याची मनीषा बाळगून आहेत; पण त्यापूर्वीच ते ज्या निवडणुकीत विजयी झाले होते, त्या २०१६ मधील अध्यक्षीय निवडणुकीतील भूत बाटलीतून बाहेर येऊन त्यांना वाकुल्या दाखवू लागले आहे.स्टॉर्मी डॅनिअल या नावाने प्रौढांसाठीच्या चित्रपटांमध्ये अभिनय करणाऱ्या स्टेफनी क्लिफोर्ड या अभिनेत्रीचा असा दावा आहे, की २००६ मध्ये तिचे ट्रम्प यांच्याशी संबंध होते. त्यानंतर २०१६ मधील अध्यक्षीय निवडणुकीच्या तोंडावर, ट्रम्प यांनी त्यांचे वकील मायकल कोहेन यांच्या माध्यमातून, क्लिफोर्डला १.३० लक्ष डॉलर्स एवढी रक्कम, त्या प्रकरणाबाबत प्रसारमाध्यमांशी न बोलण्यासाठी लाच म्हणून दिली होती, असा ट्रम्प यांच्यावर आरोप आहे.

शिवाय ती रक्कम दडविण्यासाठी त्यांनी त्यांच्या हिशेब वह्यांमध्ये गडबड केल्याचाही आरोप आहे. ट्रम्प यांनी क्लिफोर्डसोबतचे प्रकरण आणि लाच देण्याचा आरोप, दोन्ही फेटाळून लावले आहेत; पण १२ सदस्यीय ज्युरीने दोन दिवस विचारविनिमय केल्यानंतर, त्यांना एकमताने दोषी ठरविले आहे. या निर्णयामुळे ट्रम्प हे फौजदारी स्वरूपाच्या गुन्ह्यात आरोप सिद्ध झालेले पहिलेच माजी राष्ट्राध्यक्ष ठरले आहेत. रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्षीय पदाचे उमेदवार होण्यात यशस्वी झाल्यास, ते दोष सिद्ध झालेले प्रमुख राजकीय पक्षाचे पहिलेच अध्यक्षीय उमेदवारही ठरतील. या पार्श्वभूमीमुळे रिपब्लिकन पक्षाची अध्यक्षीय उमेदवार निश्चित करण्याची प्रक्रिया आणि अध्यक्षीय निवडणुकीची समीकरणेच बदलण्याची अपेक्षा आहे. आतापर्यंत ट्रम्प हे रिपब्लिकन पक्षाचे संभाव्य अध्यक्षीय उमेदवार म्हणून सर्वांत आघाडीवर होते; परंतु दोषी सिद्ध झाल्यामुळे ते माघारतील काय, अशी चर्चा सुरू झाली आहे.बदललेल्या परिस्थितीत, ट्रम्प हे अध्यक्ष म्हणून काम करण्यासाठी लायक नसल्याचा मुद्दा, बायडेन यांच्या डेमोक्रेटिक पक्षातर्फे जोरात मांडला जाईल. दुसरीकडे ट्रम्प यांच्या समर्थकांनी मात्र अद्यापही हार मानलेली नाही. ट्रम्प यांना दोषी ठरविणे ही राजकीय छळवणूक असल्याचा युक्तिवाद त्यांनी सुरू केला आहे. लोकप्रियतेत माघारलेल्या बायडेन यांच्यासाठी ज्युरीचा निकाल, ऋआंधळा मागतो एक डोळा, अन् देव देतो दोन', याच श्रेणीतील ठरला आहे.

त्यामुळे त्यांचे निवडणूक व्यवस्थापक हा मुद्दा सहजासहजी हातचा जाऊ देणार नाहीत. ट्रम्प यांच्या विरुद्ध हा खटला सुरू असतानाही ते लोकप्रियतेत बायडेन यांना टक्कर देत होते. प्रमुख दोलायमान राज्यांमध्ये (की स्विंग स्टेट्स) तर त्यांनी बायडेन यांच्यावर किंचितशी आघाडीही घेतली होती. खटला सुरू असतानाही ठामपणे ट्रम्प यांच्या पाठीशी राहिलेले त्यांचे पाठीराखे, ते दोषी सिद्ध झाल्यानंतरही खंबीरपणे त्यांची पाठराखण करत राहिले, तर कदाचित ट्रम्प हे पायउतार झाल्यानंतर पुन्हा पदारूढ होणारे दुसरेच माजी राष्ट्राध्यक्ष ठरतील. यापूर्वी केवळ ग्रोवर क्लीव्हलँड यांनाच तशी किमया करता आली होती. स्वत: बायडेन यांनीही तो धोका ओळखला आहे. त्यामुळेच एका निधी संकलन कार्यक्रमास संबोधित करताना ते म्हणाले होते, 'ट्रम्प यांना पुन्हा ओव्हल ऑफिसमध्ये प्रवेश करण्यापासून रोखण्याचा एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे मतपेटी!' अमेरिकन मतदार बायडेन यांना अभिप्रेत असलेल्या सूज्ञतेचा परिचय देतो का, हे कळण्यासाठी नोव्हेंबरपर्यंत प्रतीक्षाच करावी लागेल!

# पन्हाळा तालुक्यातील अनाधिकृत होर्डिंग्जवर कारवाईस सुरवात

## महसूल प्रशासन अँशन मोडवर धडक मोहीम राबवत उतरवली होर्डिंग्ज

**राजदंड न्युज नेटवर्क**

**पन्हाळा :** मुंबईमध्ये नुकतेच होर्डिंग्ज कोसळून मोठी दुर्घटना घडली.या दुर्घटनेत अनेक निष्पाप लोकांचे जीव गेले. त्या पार्श्वभुमीवर खबरदारीचा उपाय म्हणून पन्हाळा तालुका महसूल विभागाकडून सर्व विभागांना पावसाळा सुरु होण्या पूर्वी गर्दीच्या ठिकाणावरील अनाधिकृत व धोकादायक होर्डिंग्ज हटवण्याच्या आदेश दिले आहेत.त्यानुसार तालुक्यातील अनेक ठिकाणची होर्डिंग्ज उतरवण्यात आली आहेत तर काही ठिकाणी कारवाई केली जाणार आहे.

महसूल प्रशासनाने सार्वजनिक बांधकाम,ग्राम पंचायत,नगर परिषद, तलाठी यांना कारवाईच्या सूचना केल्या आहेत.त्या अनुषंगाने अनाधिकृत होर्डिंग्ज काढून घेणे बाबत होर्डिंग्ज धारकांना नोटीस लागू केल्या आहेत.नोटीस देऊन देखील ज्या जागा मालक, होर्डिंग्ज ठेकेदार व जाहिरातदार यांनी होर्डिंग्ज काढलेले नाहीत.त्याठिकाणी स्थानिक प्रशासन व सार्वजनिक बांधकाम विभागाकडून धडक मोहीम राबवत होर्डिंग्ज हटवण्यात येत आहेत. कारवाई सुरू होताच राक्षी फाटा येथील एका होर्डिंग्ज धारकाने स्वतः होर्डिंग्ज उतरवले.तर वाघबीळ चौकातील रांजगणे यांच्या जमिनीतील होर्डिंग्ज धारक ठेकेदार अशोक राठोड याने होर्डिंग्ज काढून घेतले नाही. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने धडक मोहीम राबवत ते होर्डिंग्ज उतरवले .या मोहीमे अंतर्गत कळे, यवलूज, वाघबीळ येथे कारवाई चालू आहे. तर इतर गावातील बस्थानक, सार्वजनिक, गर्दी व लोकांची वर्दळ असलेल्या ठिकाणावरील अनधिकृत व धोकादायक बनलेली होर्डिंग्ज उतरवली जाणार आहेत. तसेच या मोहीमे मध्ये काढलेल्या होर्डिंग्ज साहित्य जप्त केले जाणार आहे. व त्याजप्त साहित्याचा लिलाव करून मोहिमेचा खर्च भागवला जाणार आहे.

गेले तीन दिवस राबवत आसलेल्या धडक मोहिमेत सार्वजनिक बांधकाम विभागाचे सहाय्यक अभियंता विवेक चव्हाण, तलाठी रमेश वळीवडेकर, तलाठी डी,ए, भोसले, कीर्ती कांबळे, महादेव साळवी, मारुती सातार्डकर यांनी सहभाग घेतला.



**पन्हाळा वाघबीळ येथे अनाधिकृत होर्डिंग्ज उतरावताना कर्मचारी.**

# जयंत पाटील लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर काँग्रेसमध्ये जाणार? : सूरज चव्हाण



मुंबई: उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या बंडाच्या काळातही शरद पवार यांच्याशी एकनिष्ठ राहिलेले राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर काँग्रेसमध्ये जाणार असून त्यांचा काँग्रेस पक्षप्रवेशाचा मुहूर्तही ठरला आहे, असा दावा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे सूरज चव्हाण यांनी केला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अजित पवार यांनी केलेल्या बंडाला प्रफुल्ल पटेल, छगन भुजबळ, सुनील तटकरे अशा अनेक ज्येष्ठ नेत्यांनी साथ दिली असली तरीही जयंत पाटील हे शरद पवार यांच्याशी एकनिष्ठ राहिले. मात्र, अजित पवार यांच्या बंडाच्या आधीपासून आतापर्यंत जयंत पाटील शरद पवार यांची साथ सोडणार असल्याच्या चर्चा झडत असतात. यापूर्वी अनेकदा जयंत पाटील भारतीय जनता पक्षात प्रवेश करणार असल्याच्या चर्चा अनेकदा रंगल्या. आता ते काँग्रेसमध्ये जाणार असल्याच्या चर्चा रंगत आहेत.

जयंत पाटील यांनी काँग्रेसच्या सर्वोच्च नेत्या सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्या भेटीसाठी वेळ मागितली आहे. त्यांच्या काँग्रेस पक्ष प्रवेशाचा दिवस निश्चित झाला आहे. लोकसभा निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर जयंत पाटील शरद पवार यांच्याबरोबर असणार नाहीत, असा दावा चव्हाण यांनी केला आहे. निवडणूक निकालानंतर शरद पवार गट रिकामा होईल. त्यांच्या पक्षातील अनेक जण काँग्रेसमध्ये जातील तर उरलेले अजित पवार यांच्याबरोबर जातील, असे मतही त्यांनी व्यक्त केले.

# कुडाळच्या कॅडबरी बॉयने दुसऱ्याच्या घरावर दगडी मारू नये : सदाशिव सपकाळ

**सातारा :** सातारा लोकसभा निवडणुकीच्या प्रचारानिमित्त बुद्धी व वयाने बालिश व तोंडात सोन्याचा चमचा घेऊन जन्मलेल्या कुडाळच्या सौरभ राजेंद्र शिंदे यांनी व्यक्तिगत पातळीवर टीका केली. या टीकेला उत्तर द्यायचे नव्हते कारण, नोंद घेण्यासारखे व्यक्तिमत्व नाही. पण, कार्यकर्त्यांनी म्हातारी मेल्याचे दुख नाही पण काळ सोखवू नये.म्हणून खुलासा करण्यास लावलेले आहे. कॅडबरी बॉय ने टीका करताना विचार करावा. अन्यथा त्याच्या राजकीय बापाला सुद्धा त्याची फळ भोगावे लागतील. असा गर्भित इशारा जावळीचे माजी आमदार सदाशिव सकपाळ यांनी सातारा येथे झालेल्या पत्रकार परिषदेत दिला. काचेच्या घरात सोन्याच्या चमचा घेऊन जन्मलेल्या बाळाने मातीच्या घरात राहणाऱ्याच्या घरावर दगड मारू नये .अन्यथा आपल्या काचेच्या घराला तडा पडेल. असे स्पष्ट केले.



यावेळी माजी आमदार सदाशिव सपकाळ यांनी पत्रकारांना सांगितले की १९९५ साली शिवसेनेचे आमदार म्हणून भरघोस मतांनी निवडून दिले. खरं म्हणजे या परिवर्तनाच्या लढ्यामध्ये अनेकांचा वाटा आहे. युतीचे सरकार आल्यामुळे पश्चिम महाराष्ट्रातील एकमेव आमदार म्हणून मंत्री मंडळात खूप सहकार्य मिळाले. तात्कालीन मुख्यमंत्री मनोहर जोशी यांनी महाराष्ट्रातील नियोजित साखर कारखान्या संदर्भात स्थानिक आमदार म्हणून मला विचारना केली. त्यावेळेला जावळी सारख्या डोंगराळ भागात सहकारी माध्यमातून प्रतापगड सहकारी साखर कारखाना उभारण्यात येत आहे.

या साखर कारखान्यासाठी आदरणीय व गुरुवर्य माजी आमदार लालसिंगराव शिंदे, आदरणीय राजेंद्र शिंदे यांच्यासह अनेकांनी परिश्रम घेतले. याची जाणीव ठेवून मुख्यमंत्री जोशी यांना सांगितले की, राज्य शासनाने कर्जाला हमी व शासकीय भांडवल देण्यासाठी संपूर्ण सहकार्य करावे. तसेच आदरणीय शिंदे यांच्या विचारानुसार सर्व संचालकांची निवड करा. एवढंच नव्हे तर प्रतापगड साखर कारखान्याच्या उभारणीपूर्वीच नेवेकरवाडी व परिसरातील काही शेतकऱ्यांनी जमीन देण्यास नकार दिला होता. या वेळेला आमदार म्हणून मी आदरणीय शिंदे यांच्या सूचनेनुसार शेतकऱ्यांशी बैठक घेऊन त्यांना तातडीने जमीन देण्यास विनंती केली. त्या विनंतीला मान दिल्यामुळेच तीन वर्षात साखर कारखाना ट्रायल सीजन पार पडला. आणि कर्ज प्रकरणासाठी तात्कालीन केंद्रीय अर्थ राज्यमंत्री नामदार आनंदराव अडसूळसाहेब यांची भेट घेणे गरजेचे आहे. असे आदरणीय लालसिंगराव शिंदे व राजेंद्र शिंदे यांनी सांगितले. आपण वेळ पडल्यास दिल्लीलाही जाऊ असे सूचित केले परंतु, सातारचे सुपुत्र असल्यामुळे केंद्रीय अर्थराज्यमंत्री अडसूळ साहेब यांना शाहूपुरी येथील माझ्या निवासस्थानी आणून या प्रश्नाबाबत सविस्तर चर्चा केली. प्रतापगड सहकारी साखर कारखान्याला सर्व सहकार्य करण्याची विनंती केली. ती त्यांनी विनंती मान्य केली .यानंतर पुलाखालून बरेच पाणी गेल्यानंतर प्रतापगड सहकारी साखर कारखाना बंद पडण्याच्या अवस्थेत असताना आदरणीय शरद पवार साहेब यांची बारामती व मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान या ठिकाणी भेट घेतली .

प्रतापगड सहकार साखर कारखान्याची निवडणूक बिनविरोध करावी. यासाठी कारखान्याच्या वतीने श्रीमती सुनिता शिंदे, आमदार शशिकांत शिंदे व स्वतः सौरभ शिंदे व मी उपस्थित होतो. यानंतर २००४ साली प्रतापगड सहकारी साखर कारखान्याच्या यशस्वी उभारणीनंतर निवडणुकीच्या पराभवाने खचून न जाता जावली तालुक्यात ग्लुकोज कारखाना उभारणीच्या संकल्प केला. याला उदंड प्रतिसाद मिळाला. माजी मंत्री शिवाजीराव नाईक घेऊन जावळी तालुक्यातील कारखान्याची निर्मिती होत असल्यामुळे सर्वांनाच आनंद झाला होता. यासाठी २१०० रुपये प्रमाणे भाग भांडवल गोळा केले. ९० टक्के पवारवाडी येथील जमिनीचा करार केला. पण, राजकीय अडथळ्यामुळे एखादा प्रकल्प उभा करून तो बंद पडणे. ही नामुष्की आपल्या नावावर नको. म्हणून काही निर्णय घ्यावे लागले.

# आपले भविष्य भारतीय संविधानची नववी आवृत्ती प्रकाशित

**हडपसर :** सामाजिक व बहुजन चळवळ, विचारवंत ,

सुभाष वारे यांनी लिहिलेल्या आपले भविष्य भारतीय संविधान या पुस्तकाच्या नवव्या आवृत्तीचे प्रकाशन सत्यशोधक डॉ. बाबा आढाव यांच्या हस्ते आज झाले. डॉ. बाबा आढाव यांच्या ९५ व्या वाढदिवसानिमित्त या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. या प्रसंगी शीलाताई आढाव, एस एम जोशी सोशलिस्ट फाउंडेशनचे सचिव सुभाष लोमटे, हमाल मापाडी महामंडळाचे शिवाजी शिंदे, हमाल पंचायत, पुणेचे सरचिटणीस गोरख मेंगडे, कामगार नेते संतोष नांगरे, महात्मा जोतिबा फुले समता प्रतिष्ठानच्या सरचिटणीस शारदा वाडेकर, फाउंडेशनचे सहसचिव टी उपेंद्र, व्यवस्थापक राहुल भोसले उपस्थित होते. या पुस्तकाच्या आधीच्या आठ आवृत्त्या मिळून एकूण त्रेचाळीस हजार पुस्तकांची विक्री आज अखेर झालेली आहे.



संविधान साक्षरता अभियानासाठी एस एम जोशी सोशलिस्ट फाउंडेशनने प्रकाशित केलेले हे पुस्तक साध्या, सोप्या आणि प्रवाही भाषेत भारतीय संविधानाची माहिती महाविद्यालयीन युवा, शिक्षक, प्राध्यापक, संविधानप्रेमी कार्यकर्ते, तसेच शेतकरी आणि कष्टकऱ्यांपर्यंत पोहोचवत असल्याने त्याचे खूप महत्व आहे असे प्रतिपादन बाबा आढाव यांनी या प्रसंगी केले. तसेच आपल्या वाढदिवस कार्यक्रमात ही महत्वाची भेट आपल्याला मिळाल्याचे बाबांनी आवर्जून सांगितले. संविधान बचाव, देश बचाव या मोहिमेत या पुस्तकाचे मोठे योगदान आहे असे मनोगत साथी सुभाष लोमटे यांनी मांडले.

महाराष्ट्रात आजवर संविधान साक्षरता अभियानात अडीचशेहून अधिक शिबिरे आणि एक हजारहून अधिक व्याख्यानांचे आयोजन झालेले असून त्यामुळेच या पुस्तकाला वाढता प्रतिसाद मिळत आहे असे पुस्तकाचे लेखक सुभाष वारे यांनी सांगितले, संविधान बचाव साठी तसेच या अभियानात योगदान दिलेल्या सर्व कार्यकर्त्यांचे त्यांनी मनापासून आभार व्यक्त केले.

# संदीप गुळवे यांना उमेदवारी देण्याचा निर्णय

**मुंबई :** नाशिक शिक्षक मतदारसंघात शिवसेना ठाकरे गटाचे विद्यमान आमदार किशोर दराडे यांचा पत्ता कट करून नुकताच पक्षप्रवेश केलेले संदीप गुळवे यांना उमेदवारी देण्याचा निर्णय शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी घेतला आहे. मात्र, दराडे यांना याच मतदारसंघात शिवसेना शिंदे गटाकडून उमेदवारी मिळण्याची दाट शक्यता आहे.

दराडे हे ठाकरे गटाचे विद्यमान आमदार आहेत. मात्र, त्यांची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी जवळीक वाढल्याने त्यांचा पत्ता कट करण्याचा निर्णय ठाकरे यांनी घेतला आहे. दराडे यांनी ठाकरे गट सोडून अधिकृतपणे शिंदे गटात प्रवेश केल्यास त्यांना याच मतदारसंघात पुन्हा उमेदवारी दिली जाण्याची शक्यता आहे. आजच ठाकरे गटात प्रवेश करणारे गुळवे यांना ठाकरे गटाकडून उमेदवारी दिली जाणार आहे.

विधान परिषदेच्या कोकण पदवीधर मतदारसंघात ठाकरे गटातून किशोर जैन यांच्या नावाची चर्चा आहे. मात्र, महाविकास आघाडीतील काँग्रेसनेही या जागेवर आपला दावा सांगितला आहे. या मतदारसंघात रमेश कीर यांना उमेदवारी देण्याचा काँग्रेसचा विचार आहे. त्यामुळे या जागेबाबत महाविकास आघाडी कडून लवकरच निर्णय घेतला जाणार आहे.

याआधी शिवसेना उद्धव ठाकरे गटाकडून मुंबई पदवीधर मतदार संघात अनिल परब यांची तर मुंबई शिक्षक मतदार संघात जगन्नाथ अभ्यंकर यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. हे दोन्ही मतदारसंघ ठाकरे गटाकडे गेल्यामुळे कोकण पदवीधर मतदार संघावर काँग्रेसचा आग्रही दावा आहे.

# पन्हाळ्यावर एसटी चा ७६ वा वाढदिवस उत्साहात

**राजदंड न्युज नेटवर्क**

**पन्हाळा :** शाळेच्या दाखल्यावरील जन्म दिवस एक जुनआहे त्यामुळे जवळपास या दिवसाला एक अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. तसाच अनेकांच्या गरजेची लालपरी म्हणजेच एसटी आज ७६ वर्षांची झाली १ जून १९४८ रोजी पुणे-अहमदनगर मार्गावर एसटीची पहिली बससेवा चालू झाली. त्यामुळे दरवर्षी १ जून हा एसटीचा वर्धापनदिन(वाढदिवस) साजरा होतो.एसटीचा ७६ वा वर्धापनदिन (वाढदिवस) पन्हाळगडावरील बसस्थानकांवर साखर पेढे वाटून साजरा करण्यात आला.

दुर्गम डोंगरदऱ्यातील वाड्या वस्त्यांपासून आदिवासी भागातील अडी-अडचणी,अडथळ्या बरोबरच आर्थिक संकटावर मात करत ऊन, वारा,पाऊस याची तमा न बाळगता लालपरी गेली ७६ वर्षे राज्यातील सर्वसामान्य जनतेला सुरक्षित व किफायतशीर प्रवासी सेवा देण्याचे काम करत आहे.हातांच्या बोटावर मोजता येतील इतक्या बसवर चालू झालेला लालपरीचा हा प्रवास आज राज्यभरात पसरला आहे.नुसती किफायतशीरच नाही तर ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक,महिला,दिव्यांग,शालेय विद्यार्थी,पत्रकार अशा अनेक घटकांना एसटीच्या प्रवासी सेवेमध्ये सवलत मिळत आहे.याबरोबर अनेक सण,उत्सवाच्या वेळी जादा फेऱ्याची सोय करून एसटी सर्वसामान्याबरोबरच भाविकांच्या प्रवासाची सोय करणाऱ्या लालपरीचा वर्धापनदिन(वाढदिवस) पन्हाळगडावरील बसस्थानकांवर केक कापून साजरा करण्यात आला.यावेळी पन्हाळा पोलीस निरीक्षक महेश इंगळे,जेष्ठ नागरिक अनंत हावळ,वाहतूक नियंत्रक सुहास घोरपडे,एसटी कर्मचारी मदन काशिद,रामानंद गोसावी व मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.



**पन्हाळगडावरील बसस्थानकांवर केक कापताना मान्यवर व नागरिक.**

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

# टेंभुर्णीचा पाणी पुरवठा सुरळीत करा अन्यथा आंदोलन

## जनपरिवर्तन विकास आघाडीची ग्रामपंचायतीकडे निवेदनाद्वारे मागणी



**टेंभुर्णी :** टेंभुर्णी शहरातील अनियमित सुरु असणारा पाणी पुरवठा लवकरात लवकर सुरळीत करा अन्यथा १० जून रोजी ग्रामपंचायतीवर तिव्र आंदोलन करण्याचा इशारा जनपरिवर्तन विकास आघाडीच्या वतीने निवेदनाद्वारे शुक्रवारी दिला.यावेळी ग्रामविकास अधिकारी यांचेकडे लेखी निवेदन दिले.

निवेदनात म्हटले आहे की, मौजे टेंभुर्णी हे सुमारे ४० हजार लोकसंख्येचे गाव असून सदर गावामध्ये सध्या संपूर्ण पाणी पुरवठा अनियमित झाला आहे. गावामध्ये पाच ते सहा दिवसाआड फक्त एकवेळीच पाणी सोडण्यात येते. तेही पाणी अतिशय कमी दाबाने सोडले जाते. सध्या उन्हाळ्याचे दिवस असून नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करण्याची वेळ आली आहे. तसेच टेंभुर्णी हद्दीतील वाड्या-वस्त्यांवर ही मोठ्या प्रमाणात लोक राहत असून तेथे जनावरांची संख्या जास्त असल्याने पाण्याची कसली ही सोय नसल्या कारण्यामुळे जनावरांचे-माणसांचे हाल होत आहेत. वाड्या-वस्त्यावरील विहीर-बोर कोरडे पडले आहेत. तेथे ग्रामपंचायतीकडून कोणत्याही स्वरुपाचा पाणी पुरवठा होत नाही. शहरातील अनियमित पाणी पुरवठा त्वरीत करण्यात यावा. सदरची कारवाई दिनांक ७/६/२०२४ (७ जून) पर्यंत करण्यात यावी. अन्यथा १०/६/२०२४ (१० जून) रोजी ग्रामपंचायतीवर आंदोलन करण्यात येईल यांची नोंद घ्यावी. या निवेदनावर जनपरिवर्तन विकास आघाडीचे ग्रामपंचायत सदस्य राजाराम थोरात,परमेश्वर खरात,सचिन होदाडे,वैभव महाडिक, शैलेश ओहोळ,अप्पासाहेब हवलदार यांच्यासह गोरख देशमुख,सोमनाथ कदम,गणेश केचे,प्रशांत देशमुख,बाळासाहेब बारवे,शारंग गायकवाड,गणेश सरवदे यांच्यासह ग्रामस्थांच्या सह्या आहेत.

उजनी धरणातील पाणी पातळी खालावली आहे.उचल पाणी करून पाणीपुरवठा सुरळीत करण्यात आलेला आहे. जॅकवेलला आकोले भगीरथ लाईन वरून जॅकवेलला लाईट जोडली होती लाईट जोडली होती त्या ठिकाणाहून वारंवार वीज पुरवठा खंडित होत असे या आठवड्यामध्ये सुर्ली फिडर वरून स्वतंत्र लाईन पाणीपुरवठ्यासाठी चालू करण्यात आलेली आहे.तर घरकुल येथे सोलर पंप बसविलेला आहे, येत्या आठवड्यामध्ये इंदिरानगर भवानीनगर, भुई गल्ली तीन ठिकाणी सोलर पंप बसविण्यात येणार आहेत. १० ठिकाणी मोटर आणि पाण्याची टाकी बसवून देण्यात आली आहे. बंद पडलेले जास्तीत जास्त हातपंप दुरुस्त करण्यात आले.

५.ज्या वाड्या वस्त्यांवरून पाण्याची मागणी केली जात आहे त्यांना एक महिन्यापूर्वी पासूनच टँकरने पाणीपुरवठा चालू केलेला आहे.

**आमची विचारधारा लोकशाही मार्गानेच काम करणारी आहे. आज टेंभुर्णी शहरात गंभीर स्वरूपाची पाणी टंचाई निर्माण झाली आहे.त्यामुळे लोकांतूनच आंदोलन करण्याचा उठाव निर्माण झाला आहे. आज आमच्या पार्टीचे ग्रामपंचायत सदस्य व नागरिकांनी अधिकृत निवेदन ग्रामपंचायतीला दिले आहे. जर शहराचा अनियमित पाणी पुरवठा ७ जून पर्यंत सुरळीत झाला नाही तर १० जूनला आम्ही आंदोलन करीत आहोत. लोकांच्या मुलभूत गरजा सत्ताधाऱ्यांकडून पूर्ण होत नसतील आंदोलनाशिवाय पर्याय नाही-**

**सुरज देशमुख, संस्थापक,जनपरिवर्तन विकास आघाडी**

**सध्या टेंभुर्णीमध्ये दोन ते तीन दिवसानंतर पाणीपुरवठा होत असून दुष्काळी परिस्थितीमुळे किंवा वीज खंडित झाल्यास एखादा दिवस वाढतो. परंतु जिल्ह्यातील इतर परिस्थिती पाहता टेंभुर्णी शहराची व्यवस्था अतिशय चांगली आहे.मुबलक पाणीपुरवठा होण्यासाठी शासनाच्या विविध योजना राबविणार आहोत.विरोधकांचा स्वतःच्या प्रसिद्धीसाठीचा अट्टाहास चालू आहे.शहरवाशीयांनी पाण्याचा वापर काटकसरीने करावा.**

**सुरजाताई बोबडे - सरपंच टेंभुर्णी**

# निकालापूर्वीच पंकजा मुंडेंचं भावनिक आवाहन

**बीड :** भाजपचे दिवंगत नेते गोपीनाथराव मुंडे (ऋेळिपरींह र्ींपवश) यांचा येत्या ३ जून रोजी दहावा स्मृतीदिन असून या पार्श्वभूमीवर भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे (झरपज्ञरक्षर चींपवश) यांनी राज्यभरातील समस्त कार्यकर्त्यांना महत्त्वाचं आवाहन केलं आहे. यावर्षी गोपीनाथ गडावर न येता जिथे आहात तिथूनच मुंडे साहेबांचं पुण्यस्मरण करा, त्यांच्या फोटोचं पूजन करा, एखादा चांगला संकल्प करा असं आवाहन पंकजा यांनी केलं आहे. ४ जूनला लोकसभेची मतमोजणी असल्याने आपल्या विजयाचा मोठा ध्वज मुंडे साहेबांच्या चरणी अर्पण करा, असेही त्यांनी म्हटलं आहे.

पंकजा यांनी सोशल मिडियावर एक व्हिडिओ जारी करून त्यांनी कार्यकर्त्यांना विनंतीवजा आवाहन केलं आहे. दरवर्षी ३ जून हा दिवस येतो तेव्हा आपल्या सगळ्यांना हृदयामध्ये कालवल्यासारखं होतं. मुंडे साहेबांसारखा नेता, आपलं उर्जास्थान, आपलं शक्तीस्थान, आपलं प्रेरणास्थान, आपलं श्रध्दास्थान..आपल्यातून गेले ३ जून यादिवशी..माझा पिता हरवला, तुमचा नेता हरवला. माझ्या पित्यावर, माझ्या नेत्यावर तुम्ही स्वतःच्या पित्यापेक्षाही जास्त प्रेम केलं. आज दहा वर्षे झाली त्यांना जावून पण तरीही तुम्ही न चुकता ३ जूनला गोपीनाथ गडावर येता. यावेळेस एक योगायोग आलेला आहे तो म्हणजे ३ जूनला मुंडे साहेबांची पुण्यतिथी आहे आणि ४ जूनला लोकसभेची काऊंटिंग आहे. त्यामुळे, सर्व कार्यकर्ते, काऊंटिंग एजंटला ३ जून रोजी संध्याकाळीच बीडला जावे लागते, कारण पहाटे उठूनच त्यांना काऊंटिंगसाठी जावे लागणार आहे. मला ही अडचण पूर्णपणे लक्षात आहे. आपली सगळ्यांची इच्छा असून देखील आपल्या सर्वांना यायचं असून देखील ही तळमळ मी समजू शकते. म्हणून मीच तुमची ही अडचण दूर करायचं ठरवलं आहे.

मी आपल्या सर्वांना नम्र विनंती करते की, आपण जिथे आहात तिथूनच मुंडे साहेबांचं पुण्यस्मरण करा. मुंडे साहेबांच्या फोटोचं पूजन करा, एखादा चांगला संकल्प करा आणि आपण यावर्षी गोपीनाथ गडावर नाही आलात तरी चालेल. ४ जूनला मुंडे साहेबांच्या विजयाचा मोठा ध्वज घेऊन मुंडे साहेबांच्या चरणी आपण हा विजय अर्पित करूया. यावेळेस आपण नाही आलात याविषयी मनामध्ये कुठलेही दुःख बाळगू नका. आपण पुढच्यावेळी मुंडे साहेबांच्या पुण्यतिथीनिमित्त खूप चांगले समाजोपयोगी कार्यक्रम करू, त्यावेळी फार मोठया संख्येने आपण उपस्थित रहा. दरवर्षीप्रमाणे आमचं कीर्तन असतं, भोजन असतं ते आम्ही यावर्षी रद्द केलेलं आहे.

# मिरजेतील शासकीय दूध योजना होणार इतिहासजमा, प्रतिसादाअभावी फेरनिविदा प्रक्रिया

**मिरज :** कधीकाळी मिरजेचे भूषण ठरलेली शासकीय दूध योजना आता इतिहासजमा झाली आहे. शासनाने दुग्धविकास विभाग बंद केल्याने राज्यातील सर्वच शासकीय दूध योजनांचे अस्तित्व संपले आहे. त्यामध्ये मिरजेचाही समावेश आहे. योजनेला टाळे लागल्याने शेकडो कोटींच्या स्थावर संपत्तीचे काय होणार? याकडे लक्ष लागले आहे. मिरज डेअरीची सुमारे ५२ एकर जमीन काहींच्या नजरेत आली आहे.




राज्यभरातील बंद पडलेल्या शासकीय दूध योजनांतील यंत्रसामग्री, उपकरणे यासह भंगार साहित्याच्या लिलावासाठी शासनाने ऑक्टोबर २०२३ मध्ये निविदा मागविल्या होत्या. त्यांना प्रतिसादही चांगला मिळाला होता; पण या भंगार साहित्याची किंमत पुरेशी नसल्याचे निविदा भरणाऱ्यांच्या लक्षात आले. त्यांनी निविदा प्रक्रियेकडे पाठ फिरविली. त्यामुळे लिलाव रहित झाला. आता पुन्हा नव्याने शासन निविदा प्रक्रिया राबविणार आहे.

१० ते २० वर्षांपासून दूध योजना बंद असल्याने तेथील यंत्रसामग्री गंजून व किडून गेली आहे. 'जैसे थे' स्थितीत काढून न्यायची झाली, तरी हातात फार काही लागणार नाही अशी अवस्था आहे. अशीच अवस्था मिरजेतील योजनेचीही आहे. संपूर्ण यंत्रसामग्री व उपकरणे दुधाच्या आणि पाण्याच्या संपर्कात राहिल्याने त्या खराब झाल्या आहेत. सध्या योजनेच्या इमारतीची अवस्था एखाद्या मोठ्या भूत बंगल्यासारखीच आहे.

**२०१३ पासून लिटरभर दुधावरही प्रक्रिया नाही**

२०१३ पासून मिरजेतील योजनेचा कामकाज पूर्णतः बंद आहे. अगदी एक लिटर दुधावरही प्रक्रिया झालेली नाही. फक्त प्रशासकीय कामकाज सुरू आहे. राज्यभरातून अतिरिक्त झालेले दूध भुकटी व लोणी तयार करण्यासाठी मिरजेत योजनेकडे येते; पण येथील कामकाज बंद असल्याने त्यावर वारणा डेअरीकडून प्रक्रिया करून घेण्यात आली. काहीवेळा अतिरिक्त दूध मिरजेतून केरळमध्ये पाठविण्यात आले. या दुधावर प्रत्यक्ष कोणतीही प्रक्रिया मिरजेत होऊ शकली नाही.

## दुग्धविकास विभाग बंद

**शासनाने दुग्ध व्यवसाय विभाग पूर्णतः बंद करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे राज्यातील सर्वच शासकीय दूध योजनांना टाळे लागले. 'महानंद'सारख्या काही सुस्थितीतील योजना मदर डेअरीकडे किंवा राष्ट्रीय डेअरी विकास मंडळाकडे (एनडीडीबी) हस्तांतरित केल्या. सरकारी योजनांच्या पुनरुज्जीवनाचा कोणताही विचार शासनापुढे नाही. या निर्णयाने मिरजेतील योजनेच्या शवपेटीवर जणू अखेरचा खिळा मारला गेला आहे.**

# माण नदीवरील पुल अन् रस्ता दुरुस्तीसाठी रस्ता रोको

**सोलापूर :** माण नदीवरील दोन्ही बाजूच्या रस्त्यांसह पुलाच्या कामासाठी दोन वेळा रस्ता रोको आंदोलन करूनही पूर्ण केले नाही. त्यामुळे संतप्त वाहनधारक, कडलास येथील ग्रामस्थांनी माण नदी पुलावरच रस्ता रोको आंदोलन करून राष्ट्रीय महामार्ग अधिकाऱ्यांना धारेवर धरले. दरम्यान नदीवरील पुलाच्या दुतर्फा वाहनांच्या लांबच्या लांब रांगा लागल्याने सुमारे १ तास वाहतूक खोळंबली होती. अखेर राष्ट्रीय महामार्ग अभियंता अनिस खैरादी यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन येत्या १५ दिवसांत रखडलेल्या रस्त्याचे व पुलाचे काम पूर्ण केले जाईल, असे आश्वासन दिल्याने रस्ता रोको आंदोलन मागे घेतल्याचे पाणी संघर्ष समिती चळवळीचे नेते दत्तात्रय टापरे यांनी सांगितले.

शेकापचे युवा नेते डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या नेतृत्वाखाली कडलास येथील ग्रामस्थांच्या वतीने शनिवारी सांगोला-जत महामार्गावरील माण नदी पुलावर रास्ता रोको आंदोलन केले. सांगोला-जत महामार्गावरील माण व कोरडा नदीवरील पुलांची कामे व दोन्ही बाजूकडील रस्ता वगळता काँक्रिटीकरणाचे काम पूर्ण होऊन सुमारे ४ ते ५ वर्षे उलटली. परंतु सदर पुलांच्या कामांसह दोन्ही बाजूच्या रस्त्याची कामे रखडल्यामुळे येथील रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे.

आदोलनप्रसंगी सरपंच दिगंबर भजनावळे, शेतकरी सहकारी सूतगिरणीचे व्हा. चेअरमन ड. नितीन गव्हाणे, दत्ता टापरे, दत्ता जाधव, समाधान पवार, राहुल गायकवाड, संभाजी साळुंखे, संजय गायकवाड, पांडुरंग भजनावळे, अशोक ठोकळे, केशव गायकवाड, ताजू इनामदार यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

# शहर स्वच्छतेसाठी महापालिका आयुक्त उतरले रस्त्यावर

**अकोला :** अकोला महानगरपालिकेच्या वतीने विशेष स्वच्छता मोहीम सुरू करण्यात आली असून, १ जून रोजी सकाळी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. सुनील लहाने यांनी महापालिकेतील अधिकारी, कर्मचाऱ्यांसह रस्त्यावर उतरून हाती खराटा घेऊन विविध भागात साफसफाई करीत सुमारे तीन तास श्रमदान केले. एवढेच नाहीतर त्यांनी स्वतः व कर्मचाऱ्यांनी रस्त्यांवरची घाण साफ केली.



महानगरपालिकेच्या वतीने शहरातील वर्दळीच्या, गर्दीच्या ठिकाणी तसेच शहरातील ज्या भागात जास्त प्रमाणात अस्वच्छता आहे अशा भागांमध्ये १ जून रोजी सकाळी ६ ते ८ वाजेदरम्यान मनपा अधिकारी, कर्मचाऱ्यांनी रतनलाल प्लॉट, आंबेडकर नगर, एलआयसी ऑफिस, टॉवर चौक, महसूल कॉलनी, पत्रकार कॉलनी, जिल्हा मध्यवर्ती बँक, आर.एल.टी. कॉलेज समोरील रस्ता, सिव्हील लाईन चौक परिसर, नवीन बस स्टॅन्डजवळील भाग आदी भागात विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली असून विशेष स्वच्छता मोहिमेंतर्गत या भागातील रस्ते, नाल्या आणि परिसरांची सखोल स्वच्छता करण्यात आली आहे, तसेच स्वच्छता झाल्यानंतर या भागातील सर्व नाल्यांमध्ये डास, अळी नाशक औषधीची फवारणी करण्यात आली आहे.

या विशेष स्वच्छता मोहिमेत मनपा उपायुक्त गीता ठाकरे, डॉ. मेघना वासनकर, शहर अभियंता नीला वंजारी, सहा.संचालक नगर रचना आशिष वानखडे, मनपा प्रशासन अधिकारी प्रमोद टेकाडे, सहा.आयुक्त विजय पारतवार, दिलीप जाधव, देविदास निकाळजे, बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अजय गुजर, पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता अमोल डोईफोडे, स्वच्छता विभाग प्रमुख प्रशांत राजुरकर, शिवाजी महाविद्यालयाचे मुख्याध्यापक विजय ठोकळ यांच्यासह सामाजिक संघटनांचे सदस्य, अशासकीय संस्थांचे सभासद, एनसीसी व एनएसएसचे विद्यार्थी, बचत गट, वस्ती स्तर संघ आदी सहभागी झाले होते.

**प्लास्टिक वस्तुंचा वापर बंद करा, अन्यथा कारवाई**

नागरिकांनी आपल्या घरात किंवा प्रतिष्ठानात निघणारा ओला व सुका कचरा वेगवेगळा गोळा करून शहरात व परिसरात ईतरत्र तसेच नाली/नाल्यात न टाकता फक्त मनपाच्या कचरा घंटा गाडी मध्येच कचरा टाकावा, तसेच शासनाने बंदी घातलेल्या प्लास्टीकने बनलेल्या वस्तूंचा वापर, विक्री व हाताळणी पूर्णपणे बंद करण्याचे आवाहन मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. सुनील लहाने यांनी केले आहे.

# अहमदनगर जिल्ह्यात २२३ गावांना पुराचा धोका



**अहमदनगर :** जिल्ह्यातील २२३ गावे नदीकाठावर असून अतिवृष्टी झाल्यास या गावांना पुराचा धोका होण्याची शक्यता आहे. पावसाळ्यात पूर परिस्थिती निर्माण झाल्यास जिल्हा प्रशासनाकडून आतापासूनच उपाययोजना केल्या जात आहेत. यासाठी लागणारे साहित्य जिल्हा व तालुका स्तरावरील कर्मचाऱ्यांना उपलब्ध करून दिले जात आहे.

जिल्ह्यातील आठ प्रमुख नदी काठावरील २२३ गावांना पुराचा धोका होण्याची शक्यता असते. या नागरिकांची सुखरूप सुटका करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने तयारी सुरु केली आहे. जिल्हाधिकारी सिध्दराम सालीमठ यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभाग तसेच इतर विभागातील अधिकारी कर्मचारी यांना सूचना करण्यात आल्या आहेत.

जिल्ह्यातील पर्जन्याची दैनंदिन माहितीसाठी ९७ महसूलमंडळांमध्ये ऑटोमॅटिक वेदर स्टेशन कार्यान्वित करण्यात आले आहेत. तसेच आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने जिल्हाधिकारी नियंत्रण कक्ष २४ तास कार्यान्वित करण्यात आला आहे. दूरध्वनी क्रमांक ०२४१-२३२३८४४/२३५६९४० तसेच टोल फ्री क्रमांक १०७७ वर नागरिकांना संपर्क करता येणार आहे.

# फ्लेक्स, होर्डिंग उतरले अन् साताऱ्याचे रूप बदलले

**सातारा :** सातारा शहराला लागलेले अनधिकृत फ्लेक्स व होर्डिंगचे ग्रहण आता सुटू लागले असून, हे शहर कित्येक वर्षांनंतर मोकळा श्वास घेऊ लागले आहे. शहरातील प्रमुख चौक व रस्त्यांचे बदललेले हे रूप पाहून सातारकरांमधूनही पालिकेचे कौतुक होत आहे.

सातारा शहर स्वच्छ व सुंदर आहेच; परंतु या शहरात पाऊल ठेवले की मोठ-मोठे फ्लेक्स अन् होर्डिंग नजरेस पडायचे. पालिकेकडून नो फ्लेक्स झोन जाहीर करूनही त्याचा फ्लेक्स व होर्डिंगधारकांवर फारसा प्रभाव झाला नव्हता. पालिकेच्या कारवाईला न जुमानता शहरातील प्रमुख चौक, रस्ते तसेच इमारतींवर फ्लेक्स व होर्डिंग उभारले जात होते. अलीकडच्या दीड-दोन वर्षांत वर्षांत हे प्रमाण इतके वाढले की संपूर्ण शहर फ्लेक्स व होर्डिंगच्या आड गुडूप होऊन गेले.

मात्र, घाटकोपर दुर्घटनेत झालेल्या जीवितहानीनंतर संपूर्ण राज्यातील होर्डिंग व फ्लेक्सचा विषय चर्चेचा ठरला. सातारा जिल्हा प्रशासनानेदेखील होर्डिंगचा विषय गांभीर्याने घेत अनधिकृत होर्डिंग हटविण्याचे आदेश स्थानिक स्वराज्य संस्थांना दिले. सातारा पालिका प्रशासनाने आठ दिवसांपासून कारवाईस प्रारंभ केला असून, आतापर्यंत पंधराहून अधिक अनधिकृत होर्डिंग व शेकडो फ्लेक्स मुळासकट काढून टाकले आहेत. फ्लेक्स व होर्डिंगची गर्दी कमी होऊ लागल्याने या शहराचे रूपही आता हळूहळू बदलू लागले आहे.



**खांद्यावरील ओझे हलके**

सातारा शहरातील इमारती व सार्वजनिक रस्ते गेल्या अनेक वर्षांपासून फ्लेक्स व होर्डिंगचा भार सहन करत आले आहेत. खांद्यावरील हे ओझे उतरू लागल्याने इमारती, रस्ते व दुकानांनाही आता हलके-हलके वाटू लागले आहे. हा बदल पाहून परगावातून साताऱ्यात येणाऱ्या शेतकरी व नोकरदारांनाही सुखद धक्का बसत आहे.पालिकेने सातत्य ठेवावे..

घाटकोपर येथील घटना दुर्दैवीच आहे. मात्र, या घटनेनंतर प्रशासनाने कारवाईचे ठोस पाऊल उचलल्याने त्याचे चांगले परिणामही दिसू लागले आहेत. सातारा शहराला राजधानीचा मान मिळाला आहे. त्यामुळे या शहराचे विद्रुपीकरण होईल असे कृत्य कोणीही करू नये. पालिका प्रशासनाने सुरू केलेली ही कारवाई योग्यच असून, यात सातत्य ठेवायला हवे, असे मत नागरिकांनी व्यक्त केले.



**जोर, ता.वाई येथील बलकवडी धरणापासून महाबळेश्वर येथील केट्स पॉईटचे काढलेले विहंगम दृश्य (छाया : शुभम गुरव)**

# महाबळेश्वरमधील विशाल अग्रवालचे बेकायदेशीर हॉटेल सील



**महाबळेश्वर :** शासकीय मिळकतीचा गैरवापर केल्याप्रकरणी महाबळेश्वर येथील विशाल अग्रवाल याचे हॉटेल एम पी जी क्लब हे जिल्हा प्रशासनाच्या आदेशाने सील करण्यात आले. यासंदर्भात माहिती अधिकार कार्यकर्ता अभय हवालदार यांनी तक्रार दाखल केली होती. त्या तक्रारीची दखल घेऊन जिल्हा प्रशासनाने ही कारवाई केली. जिल्हा प्रशासनाने घेतलेल्या भुमिकेमुळे महाबळेश्वर शहर परिसरातील हॉटेल उद्योगात एकच खळबळ उडाली आहे.

पुणे येथील कल्याणीनगरात झालेल्या कार अपघातानंतर या अपघातातील मुख्य आरोपीचे वडील बिल्डर विशाल अग्रवाल यांचे महाबळेश्वर कनेक्शन उघडकीस आले. विशाल अग्रवाल यांनी पारशी जीमखाना या ट्रस्टकडे रहिवास कारणासाठी असलेली शासकीय मिळकत स्वतः कडे घेतली. या ट्रस्टवर असलेले यांचे नावे वगळून स्वतःच्या घरातील नावे ट्रस्टी म्हणून घेतली. त्यानंतर या मिळकतीमध्ये तारांकित हॉटेल बांधले. अशाप्रकारे रहिवासाकरीता शासनाकडून मिळालेल्या जागेचा वाणिज्य वापर सुरू केला. यासाठी विशाल अग्रवाल यांनी या मिळकतीमध्ये मोठ्या प्रमाणावर विनापरवाना बांधकाम केले आहे.- ऊत्एठढखडएचएछढ्याबाबत येथील माहिती अधिकार कार्यकर्ते अभय हवालदार यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार केली होती. दरम्यान पुणे येथील कल्याणीनगर येथे अपघात झाला आणि विशाल अग्रवाल यांचे महाबळेश्वर येथे देखील हॉटेल असल्याचे उघडकीस आले. जिल्हा प्रशासनाच्यावतीने एमपीजी क्लब या हॉटेलमधील बार बंद केला होता. तर शनिवारी सकाळी साडे सात वाजता प्रांताधिकारी राजेंद्रकुमार जाधव यांच्या नेतृत्वाखाली महसूल व पालिकेच्या पथकाने या हॉटेलवर धडक मारली. हॉटेलवर कारवाई करण्यासाठी पथक येताच हॉटेल व्यवस्थापनाने हॉटेल मधील सर्व पर्यटकांच्या ताब्यात असलेल्या खोल्या खाली करण्यास प्रारंभ केला.

सकाळी साडे नऊ वाजता हॉटेल मधील खोल्या सील करण्याची कारवाई पथकाकडुन सुरू करण्यात आली. या पथकाने हॉटेल मधील ३२ खोल्या, ८ कॉटेज, स्पा, जीम, रेस्टॉरट, किचन, स्वागतकक्ष, स्टाफ रूम स्टोअर रूम अशा ४८ खोल्यांना सील ठोकले. कारवाई केल्यानंतर महसूल विभागाच्या वतीने या कारवाईचा पंचनामा करण्यात आला. शेवटी हॉटेलचे गेट सिल करून कारवाई पूर्ण करण्यात आली. या कारवाईचा अहवाल जिल्हाधिकारी यांना पाठविण्यात येणार असल्याची माहीती प्रांताधिकारी राजेंद्रकुमार जाधव यांनी दिली. या कारवाईवेळी तहसिलदार तेजस्विनी पाटील यांच्यासह पालिकेचे अधिकारी हे देखील उपस्थित होते.हॉटेल टाळे ठोकले वीज पुरवठाही केला बंद

शासकीय मिळकतीचा गैरवापर केल्याप्रकरणी महसूल विभागाने एमपीजी क्लब या हॉटेलला टाळे ठोकले. तसेच कारवाई पूर्ण झाल्यानंतर या हॉटेलचा वीज पुरवठा देखील तात्काळ बंद करण्यात आला.

# डीएडसाठी ३ जूनपासून प्रवेश प्रक्रिया!

## ३ जून २०२४ पासून उमेदवारांना अर्ज भरता येणार

**जळगाव :** शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी डी.एड. प्रथम वर्षाचे प्रवेश ऑनलाइन पद्धतीने करण्यात येणार असून, दि. ३ जून २०२४ पासून उमेदवारांना अर्ज भरता येणार आहे. जिल्ह्यात गेल्या वर्षी १७ विद्यालयांनी प्रवेश प्रक्रियेसाठी नोंदणी केली होती. त्यातील तीन विद्यालयांमध्ये प्रवेश फेरीअखेर एकही जागा रिक्त शिल्लक नव्हती. मंजूर सर्व जागांवर विद्यार्थ्यांचे प्रवेश झाले होते.

प्रवेशासाठी इच्छूक असलेले कला, वाणिज्य, विज्ञान, एमसीव्हीसी शाखेतील पात्र उमेदवार हे इयत्ता १२ वी खुल्या संवर्गात किमान ४९.५ टक्के व अन्य संवर्गात किमान ४४.५ टक्के गुणांसह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. व्यवस्थापन कोट्यातून प्रवेश घेण्यासाठी ऑनलाइन प्रक्रियेतील अर्ज भरणे बंधनकारक आहे. गेल्या शैक्षणिक सत्रात जळगाव जिल्ह्यात १७ अध्यापक विद्यालयांनी नोंदणी केली होती. ९०० प्रवेश क्षमता उपलब्ध होती. त्यापैकी ५३३ जागांवर प्रवेश झाले होते. नवीन सत्रासाठी विद्यालयांची नोंदणी सुरू आहे. यामध्ये गेल्या वर्षाप्रमाणे विद्यालयांची संख्या कायम राहू शकते किंवा कमी होऊ शकते.

**जुलैत वर्ष होणार सुरू...**

**सध्याच्या घोषित वेळापत्रकानुसार २०२४-२५ या शैक्षणिक सत्राच्या प्रथम वर्षाची सुरुवात १५ जुलैपासून होणार आहे.**

या ठिकाणी भरा अर्ज...

विद्यार्थ्यांनी् .ारर.रल.ळप या संकेतस्थळावर अर्ज भरायचे आहेत. प्रवेश नियमावली, अध्यापक विद्यालयांची यादी, वेळापत्रक व प्रवेशाबाबतच्या सूचना संकेतस्थळावरील इम्पोर्टंट इन्फॉर्मेशन या टॅबमध्ये उपलब्ध असणार आहे. अर्ज भरताना स्वत:चा ई-मेल आयडी व मोबाइल नंबर देणे आवश्यक आहे.

असे आहे वेळापत्रक (शासकीय कोटा)...

- उमेदवारांनी ऑनलाइन अर्ज भरणे - दि. ३ जून ते दि. १८ जून
- अर्जांची ऑनलाइन पडताळणी - दि. ३ जून ते दि. १९ जून
- गुणवत्ता यादीवरील हरकतींचे निरसन - दि. २४ जून
- पूर्ण भरलेल्या अर्जांची गुणवत्ता यादी प्रसिद्ध - दि. २६ जून
- प्रथम फेरी प्रवेशाची यादी - दि. २७ जून
- प्रथम फेरीतील उमेदवारांना प्रवेश - दि. २७ जून ते १ जुलै

डी.एड.साठी दि. ३ जूनपासून ऑनलाइन प्रवेशप्रक्रिया सुरू होणार आहे. त्याची सविस्तर माहिती संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहे. त्यामधील सूचनांनुसार विद्यार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज भरावेत, अशी माहिती जळगाव डायटचे प्राचार्य डॉ. अनिल झोपे यांनी दिली.

## काँग्रेसच्या दुष्काळ पाहणी समितीची उद्या कराडमध्ये बैठक

**कराड :** वाढत्यादुष्काळाचीदाहकता लक्षात घेता महाराष्ट्र प्रदेशकाँग्रेसकमिटीने विभागवार दुष्काळपाहणी समिती गठीत केली आहे. पश्चिम महाराष्ट्र विभागाच्या समिती प्रमुखपदी माजी मुख्यमंत्री आमदार पृथ्वीराज चव्हाण यांना जबाबदारी दिली असून या समितीची नियोजन बैठक रविवारी दि. २ जून रोजी दुपारी १२ वाजता शासकीय विश्रामगृह, कराड येथे आयोजित केली आहे. या बैठकीस समितीमधील सदस्य व पश्चिम महाराष्ट्रातीलकाँग्रेसचेसर्व आमदार उपस्थित राहणार आहेत.

संपूर्ण महाराष्ट्र भीषण दुष्काळात होरपळत असून पिण्याचे पाणी आणि चाऱ्याची प्रचंड मोठी टंचाई निर्माण झाली आहे. भयंकर परिस्थिती असताना सरकारकडून कोणतीही उपाययोजना केली जात नाही. पाण्याचे टँकर, रोजगार हमीची कामे, चारा छावण्या अद्याप सुरु नाहीत. सरकारला या परिस्थितीचे गांभीर्यही नाही यामुळे विरोधी पक्ष नात्याने सरकारला दुष्काळ प्रश्नांवर गांभीर्याने विचार करण्यासाठी प्रदेश काँग्रेसने विभागवार समिती गठीत केली आहे. यानुसार पश्चिम महाराष्ट्र विभागाच्या समिती प्रमुख पदाची जबाबदारी राज्याचे माजी मुख्यमंत्री आमदार पृथ्वीराज चव्हाण यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

दुष्काळ पाहणी समितीमध्ये १३ सदस्य आहेत. यामध्ये आमदार सतेज पाटील, विश्वजित कदम, प्रणिती शिंदे, संग्राम थोपटे, संजय जगताप, विक्रमसिंह सावंत, जयश्री जाधव, ऋतुराज पाटील, राजू आवळे, रवींद्र धंगेकर, जयंत आसगावकर तसेच प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस संजय बालगुडे या समितीचे समन्वयक असणार आहेत. तसेच या समितीमध्ये विशेष निमंत्रित म्हणून या जिल्ह्यातील सर्व जिल्हाध्यक्ष यांची सुद्धा नियुक्ती करण्यात आली आहे.

# लिंबखिंडीत सेवा रस्त्यावरील दुर्घटना : चालकाचे पलायन



**लिंब :** भरधाव वेगात निघालेल्या कर्नाटकच्या टाटा एलपीटी (वाहन क्र. टी.एन.८८के.१२८२) या चारचाकी अवजड वाहनाने मोटर सायकलला जोरदार धडक दिल्याने झालेल्या अपघातात सातारा तालुक्यातील लिंब गावचे प्रसिद्ध व्यापारी व सामाजिक कार्यकर्ते रामचंद्र रघुनाथ उर्फ बाबू खादगे (वय ५०) यांचा जागीच मृत्यू झाला तर त्यांच्या पत्नी कल्पना रामचंद्र खादगे (वय ४५ वर्षे) गंभीर जखमी झाल्या.

ही धडक इतकी जोराची होती ज्यामध्ये जागेवरच खादगे यांचा मृत्यू झाला तर फेकल्या गेल्याने पत्नी गंभीर जखमी झाल्या. घटनेची माहिती मिळताच तालुका पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. स्थानिकांनी तात्काळ जखमींना उपचारासाठी रूग्णालयात दाखल केले. पोलिसांनी घटनास्थळी पाहणी करत सीसीटीव्ही फुटेज तपासले त्यावरून गाडीचा तपशील मिळाला असून हे वाहन कर्नाटकचे असल्याची माहिती समजते आहे. या बाबत पुढील तपास तालुका पोलिसांकडून सुरू झाला आहे. अज्ञात वाहन चालकांवर गुन्हा दाखल केला असून अवजड वाहन चालक व त्याला लवकरच ताब्यात घेण्यात येईल असा विश्वास पोलिसांनी संतप्त नातेवाईकांना दिला.

याबाबत अधिक माहिती अशी की, शुक्रवार ता ३१ मे रोजी सकाळी दहाच्या सुमारास लिंब खिंडीजवळ ही दुर्घटना घडली. बाबू खादगे हे मोटरसायकलवरून पत्नीसमवेत सकाळी दहा वाजता लिंबहून सातारला यायला निघाले होते. नागेवाडी फाट्याकडून सेवा रस्त्याने येत असताना समोरून भरधाव वेगात आलेल्या टाटा एलपीटी या अवजड वाहनाने त्यांना जोरदार धडक दिली व अपघात होऊनही वाहनचालक तसाच भरधाव निघून गेला. त्यात मोटरसायकलचा चेंदामेंदा झाला. या दुर्घटनेत डोक्याला गंभीर इजा पोहोचून बाबू खादगे यांचा जागीच मृत्यू झाला, तर त्यांच्या पत्नी कल्पना या गंभीर जखमी झाल्या. त्यांना उपचारार्थ सातारा येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

या अपघातामुळे अवजड वाहन चालकांच्या मुजोरपणाचा व बेदरकारपणाचा विषय पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. लिंब खिंड परिसरात क्रशरचे साम्राज्य मोठ्या प्रमाणात असून त्यांच्या जीवावर तेथे काम करणाऱ्या डंपर चालकांची मुजोरी चालते. सेवा रस्त्यावरूनही हे डंपर प्रचंड वेगाने धावत लोकांसाठी कर्दनकाळ बनत आहेत. या परिसरात सेवा रस्त्यावरच वर्षाला किमान दहा ते पंधरा अपघात होत असतात. या मध्ये आरटीओ , वाहतूक शाखा यांच्याकडून देखील अवजड वाहन चालकांच्या बाबतीत सातत्याने होणाऱ्या अपघाताच्या घटनांवर अंकुश राखण्यासाठी प्रयत्न होताना दिसत नसल्याचे देखील वास्तव समोर आले आहे.

# व्हॉलीबॉलमध्ये शाहु क्रिडा मंडळाचे कार्य कौतुकास्पद

## पोलिस निरीक्षक महेश इंगळे शाहु क्रिडा मंडळाचे उन्हाळी व्हॉलीबॉल प्रशिक्षण शिबीराची सांगता



**उन्हाळी व्हॉलीबॉल प्रशिक्षण शिबिराच्या सांगता समारंभाप्रसंगी सहभागी खेळाडु सोबत पोलिस निरीक्षक महेश इंगळे यांच्यासोबत आदी मान्यवर.**

**पन्हाळा :** पन्हाळगडाला ऐतिहासिक महत्त्वाबरोबर व्हॉलीबॉल खेळाची देखील परंपरा आहे.पन्हाळगडावर हा खेळ टिकुन राहण्यासाठी तसेच दर्जेदार खेळाडु तयार करण्यासाठी शाहु क्रिडा मंडळाचा सातत्याने प्रयत्न सुरु असतात. त्यामुळे व्हॉलीबॉल क्षेत्रात शाहू क्रिडा मंडळाचे कार्य कौतुकास्पद आहे. पन्हाळ्या वर व्हॉलीबॉलसाठीअहोरात्र मेहनत घेणारे स्वर्गीय दिलीप जोशी यांचा वारसा मंडळाने पुढे घेवुन जाण्याचे काम करावे.असे प्रतिपादन पन्हाळा पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक महेश इंगळे यांनी केले.

शाहु क्रिडा मंडळ यांच्या वतीने मुला-मुलींसाठी आयोजित उन्हाळी व्हॉलीबॉल प्रशिक्षणाच्या सांगता समारंभा प्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणुन बोलत होते.ते पुढे म्हणाले की,आज मोबाईलच्या जमान्यात मुलांना खेळाचा विसर पडत चालला आहे.जीवनात खेळाला फार महत्त्व आहे.खेळाचा आपल्या जीवनात तसेच आरोग्य उत्तम राहण्यासाठी निश्चितपणाने उपयोग होतो. खेळामुळे उत्तम करिअर देखील घडवता येते.तरी जीवनात खेळाला देखील महत्त्व देणे गरजेचे असुन पालकांनी आपल्या पाल्याला सध्याच्या युगात खेळासाठी प्रव्रुत्त करावे.शाहु क्रिडा मंडळाने व्हॉलीबॉलची परंपरा जपली असुन राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय, राज्यस्तरीय खेळाडु घडविले आहेत.त्यामुळे पन्हाळ्याचे नाव देशात उंचावले आहे.

मंडळाकडुन दरवर्षी उन्हाळी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात येते.यावर्षी देखील १० मे ते २५ मे या पंधरा दिवसाच्या कालावधीत हे शिबिर आयोजित करण्यात आले होते.या शिबिरात ५२ खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता.या खेळाडुंना व्हॉलीबॉल प्रशिक्षणासह बौद्धीक विकास,शिस्तपालन याचे धडे देण्यात आले. शिबिरात सहभागी खेळाडुंना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्र व भेट वस्तु देण्यात आले.यावेळी मंडळाचे सहसचिव सोपान गोसावी,रेखा जोशी(मँडम),पन्हाळ्याच्या माजी उपनगराध्यक्ष सुरेखा गोसावी,राष्ट्रीय खेळाडु संजय देसाई,राष्ट्रीय पंच रामानंद गोसावी,बाळासाहेब भोसले,संजय दळवी सर यांच्यासह पालकवर्ग व खेळाडु उपस्थित होते. शिबिर चांगल्या पद्धतीने पार पाडण्यासाठी राष्ट्रीय पंच रामानंद गोसावी,मुतंजर मुजावर,प्रमोद धडेल,संकेत नाखरे,सागर गोसावी यांनी परिश्रम घेतले.सुत्रसंचालन मुतंजर मुजावर,प्रास्ताविक रामानंद गोसावी तर आभार राष्ट्रीय खेळाडु अबिद मोकाशी यांनी मानले.

# भोर पोलिसांची अवैध गावठी हातभट्टी दारु विक्री करणाऱ्यांवर सलग दुसरी कारवाई

## भोर पोलीस क्शन मोडवर.... तर नाव व प्रतिष्ठा जपण्यासाठी जुजबी करवाई... जनतेत चर्चेला उधाण..

**भोर :** भोर शहरातील नागोबा आळी, पिराचा मळा, एस टी स्टँड आणि चौपाटी परिसरात विनापरवाना गावठी हातभट्टी दारूविक्री करणाऱ्यावर सलग दोन वेळा कारवाई करण्यात आली. त्यांपैकी तीन जणांवर भोर पोलिसांनी मंगळवारी (ता.२८) रात्री कारवाई करत त्यांच्याकडून २ हजार ७०० रुपयांची २७ लिटर गावठी हातभट्टीची दारू जप्त केली. तर गुरुवार ( दि.३०) रोजी सायंकाळी पावणे सहा ते साडे सात दरम्यान दोन जणांवर कारवाई करत त्यांच्याकडून ६ हजार २०० रुपयांची ६२ लिटर गावठी हातभट्टी दारु जप्त केली. त्यांच्यावर भोर पोलीस ठाण्यात दारुबंदी अधिनियमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भोर पोलीस जरी क्शन मोडवर असले तरी नाव व प्रतिष्ठा जपण्यासाठी अशा जुजबी कारवाया केल्या जात असल्याच्या जनसामान्य जनतेत चर्चेला उधाण आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार भोर पोलिसांच्या पथकाने मंगळवारी (दि.२८) रोजी रात्री सव्वाआठ ते पावणेनऊ या वेळेत शहरातील तीन ठिकाणी छापे टाकले. त्यामध्ये सागर दशरथ धोंडे (वय ३५ रा.नागोबा आळी) याच्या कडून एका प्लॅस्टिक कॅनमध्ये सुमारे ९०० रुपये किमतीची गावठी हातभट्टी दारु तसेच हनुमंत सोपान मळेकर (वय ४०,रा.पिराचा मळा,भोर) याच्याकडून एका प्लॅस्टिक कॅनमध्ये सुमारे १००० रुपये किमतीची गावठी हातभट्टी दारु आणि मंगेश हनुमंत चिकणे (वय ४२, रा. नागोबा आळी) याच्याकडून एका प्लॅस्टिक कॅनमध्ये सुमारे ८०० रुपये किमतीची गावठी हातभट्टी दारु असे या तिघांनकडून एकूण २ हजार ७०० रुपयां ची २७ लिटर गावठी हातभट्टीची दारू जप्त केली. असून भोर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

तर गुरुवार ( दि.३०) रोजी सायंकाळी पावणे सहा ते साडे सात दरम्यान दोन ठिकाणी छापे टाकले. शहरातील एसटी स्टँड जवळील स्मशानभूमी मागच्या भिंतीच्या आडोशाला त्यामध्ये प्रदीप महेंद्र भिलारे ( वय ३४ रा. नांद ता.भोर) याच्याकडून एका प्लॅस्टिक कॅनमध्ये सुमारे ३००० रूपये किमतीची गावठी हात भट्टी दारु आणि दिपक अंकुश पवार ( वय ३९ चौपाटी भोर ) याच्याकडून एका प्लॅस्टिक कॅनमध्ये सुमारे ३२०० रुपये किमतीची गावठी हातभट्टी दारु जप्त केली असून भोर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे

सदर कारवाई भोरचे उपविभागीय पोलिस अधिकारी तानाजी बर्डे, भोरचे पोलिस निरीक्षक अण्णा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक दीप्ती करपे, पोलिस उपनिरीक्षक अनिल चव्हाण व पोलिस उपनिरीक्षक अशोक खुटवड पोलिस हवालदार उद्धव गायकवाड, विकास लगस, गणेश भिसे, अभय बर्गे यांनी ही कारवाई केली. पोलिसांनी तीनही आरोपींविरोधात गुन्हा दाखल केला. या गुन्ह्यांचा पुढील तपास पोलिस नाईक धर्मवीर खांडे व अतुल मोरे हे करीत आहेत.

**नाव व प्रतिष्ठा जपण्यासाठी जुजबी करवाई....**

**भोर शहर व परिसरात अनेक ठिकाणी मटका, जुगार, दारु, गांजा, गुटखा विक्री जोमात सुरु असून धंदेवाल्यांचा परीसरात दबदबा असल्याने सर्वसामान्य नागरिक तक्रार करण्यासाठी धाजावत नाही. कारण सर्व सामान्यांच्या उघड्या डोळ्यांना खुलेआम दिसणारे धंदे पोलिसांना मात्र का दिसत नाहीत..? अशा दबक्या आवाजात नागरिकात बोलले जात असून यांना आशीर्वाद कोणाचे..? का केवळ दाखवण्यासाठी अशा छोट्या कारवाई करुन नाव व प्रतिष्ठा जपायची..? अशा चर्चे ला नागरिकात उधाण आले आहे. शहरासह ग्रामीण भागातील सर्वच बेकायदेशीर धंद्यावर करवाई होणार असून कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही.**

**- अण्णा पवार**

**पोलिस निरीक्षक भोर पोलीस स्टेशन**

# कोयना नदीपात्रात प्रशासनाकडून बोटींग प्रशिक्षण



## आपती काळात पाटण प्रशासन अलर्ट मोडवर

**पाटण :** आगामी पावसाळ्याच्या पाश्र्वभूमीवर पाटण प्रशासन अलर्ट झाले असून संभाव्य अतिवृष्टी, पूरपरिस्थिती आदी नैसर्गिक आपत्ती काळात सामना करण्यासाठी पाटण तालुका आपत्ती व्यवस्थापन समितीकडून स्थानिकांना व टीमला बोटी चालवण्याबाबत येथील मुळगाव पुलाजवळ कोयना नदीपात्रात प्रशिक्षण देण्यात आले व जनजागृतही करण्यात आली. प्रांताधिकारी सुनील गाढे यांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी तहसीलदार अनंत गुरव, प्र. नायब तहसीलदार, कराडचे संजय अडसूळ, अविनाश तोडकर, विलास गबाले, नगरपंचायतीचे अधिकारी, कर्मचारी, मंडलाधिकारी, कोयना नदीकाठावरील विविध गावचे तलाठी, सरपंच, ग्रामस्थ उपस्थित होते.

पाटण तालुक्यात पडणारा पाऊस व कोयना धरणातून सोडण्यात येणाऱ्या पाण्यामुळे कोयना, केरा नद्यांच्या पाण्याने धोक्याची पातळी ओलांडली जाते. त्यामुळे पाटणमधील अनेक घरांमध्ये पाणी शिरते. घरांना पाण्याचा वेढा पडल्याने अनेकजण घरातच अडकून पडतात. केरा पुलानजिक असणारा पशुवैद्यकीय दवाखाना, स्मशानभूमी परिसर, केरा पुलापासून ते जुना बसस्थानक, झेंडाचौक, धांडे पूल, नवीन बसस्थानक, कळके चाळ, रामापूर, ग्रामपंचायतीची जुनी इमारत, मार्केट यार्ड परिसर असा सर्व परिसर पुराच्या पाण्याखाली जात असतो. तसेच कोयना नदीकाठावरील मुळगाव, येराडसह अनेक गावांना या पुराचा फटका बसत असतो. अनेकजण पुराच्या पाण्यात व घरातच अडकून पडतात.

अशा परिस्थितीत लोकांना बाहेर काढताना प्रशासकीय यंत्रणेला मोठ्या अडचणीचा सामना करावा लागतो. यास्तव प्रांताधिकारी सुनील गाढे यांच्या मार्गदर्शनाखाली मान्सूनपूर्व तयारीचा भाग म्हणून पाटणमधील स्थानिकांना आणि टीमला कोयनानदीत बोट चालवण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. तसेच जनजागृतीही करण्यात आली. पावसाळ्यात अशा प्रकारे आपत्ती उद्भवल्यास या बोटीमुळे नागरीकांना बाहेर काढणे सोयीस्कर होणार आहे.

**तहसील कार्यालयात चोवीस तास आपत्ती व्यवस्थापन कक्ष स्थापन करण्यात आला असून आपत्तीची माहिती याठिकाणी घेतली जाईल. अनंत गुरव , तहसिलदार पाटण .**

यावेळी पाटण येथील कोयना नदीपात्रात प्रत्यक्षपणे नगरपंचायतीचे कर्मचारी व स्थानिक नागरिकांना बोट चालविण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. त्याचबरोबर बोटीबाबतची सविस्तर माहिती देण्यात आली. यावेळी कोयना नदीकाठी बघ्यांची मोठी गर्दी जमली होती.